ePaper

कर्णानंतर दुसरे दानशूर म्हणजे एकनाथ शिंदे, उत्तम जानकरांकडून कौतुक

| वर्ष - 8 | अंक - 356 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज ™

## आतील पानांत

- विषय गंभीर तिथे रूट खंबीर!
- ९ फलंदाजांनी मिळून घडवला इतिहास
- ऑपरेशन सखलद्वारे दोन अतिरेकी ठार!
- लोकसभा निवडणुकांमध्येही गैरप्रकार

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 5 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 'चक दे इंडिया' चा जयघोष : ओव्हल वर सहा धावांनी इंग्लंडची जिरली : मालिका बरोबरीत...

# 'टीम इंडिया' चा थरारक विजय !

## ज्येष्ठ आणि श्रेष्ठ खेळाडूंकडून गौरवोद्गार, अभिनंदन, सिराज ची अफलातून गोलंदाजी!

| ओव्हल / लंडन / नवी दिल्ली | प्रतिनिधी | महाईन्यूज

**ऐतिहासिक ओव्हलच्या मैदानावर भारताने पाचव्या आणि शेवटच्या कसोटीत इंग्लंडवर सहा धावांनी थरारक विजय मिळवत २०२५ 'अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी ' २-२ अशी बरोबरीत संपवली. संपूर्ण क्रिकेट जगतात 'चक दे इंडिया' चा जयघोष झाला. भारताचा वेगवान गोलंदाज महम्मद सिराजने या कसोटी सामन्यात कमाल गोलंदाजी केली आणि इंग्लंडचे कंबरडे मोडले. देशातील अनेक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ खेळाडूंनी भारतीय संघावर स्तुती सुमने उधळली असून कौतुकांची थाप मारली आहे.**




### अंगावर शहारे आले...!

भारताच्या थरारक विजयानंतर क्रिकेटविश्वात भावनांचा महापूर वाहू लागला. सचिन तेंडुलकरपासून ऋषभ पंतपर्यंत सर्वांनीच भारतीय संघाचे गोडवे गायले आहेत. या ऐतिहासिक विजयाने संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले आणि भारतातील अनेक दिग्गज खेळाडूंनी या कामगिरीवर उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिल्या आहेत.

### महम्मद सिराजने फडशा पाडला...

चौथ्या दिवशी पावसामुळे आणि खराब प्रकाशामुळे खेळ थांबवण्यात आला, तेव्हा इंग्लंडचे सहा बाद ३३९ धावा झाल्या होत्या आणि विजयासाठी केवळ ३५ धावांची गरज होती. त्यांच्या हातात चार गडी शिल्लक होते. मात्र, अखेरच्या दिवशी भारताला पाहिजे असलेल्या चार विकेट्स मिळवण्यासाठी महम्मद सिराजने जबाबदारीचे ओझे खांद्यावर घेतले आणि ८५.१ षटकांत इंग्लंडला ३६७ धावांवर गारद करत सामना भारताच्या बाजूने झुकवला. प्रसिद्ध कृष्णाने देखील महत्वाची भूमिका बजावत १२६ धावा देऊन चार बळी घेतले आणि विजयामध्ये मोठा वाटा उचलला.

### अनेक दिग्गज कौतुकासाठी सरसावले

या दिमाखदार विजयावर क्रिकेटविश्वातील अनेक दिग्गजांनी भारताचे कौतुक केले आहे. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर, युवराज सिंग, माजी बीसीसीआय अध्यक्ष आणि माजी कर्णधार सौरव गांगुली, हरभजन सिंग, ऋषभ पंत, शिखर धवन, इरफान पठाण आणि विराट कोहली यांच्यासह अनेकांनी शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील या युवा टीमला शुभेच्छा दिल्या. तसेच महम्मद सिराजच्या दमदार गोलंदाजीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### शहारे आणणारा सामना

भारतीय क्रिकेटचा दिग्गज खेळाडू सचिन तेंडुलकरने भारताच्या थरारक विजयानंतर त्यांच्या 'एक्स' अकाउंटवर पोस्ट करत लिहिले की, "टेस्ट क्रिकेट... खरंच शहारे आणणारा सामना होता, मालिका २-२, परफॉर्मन्स १०/१०. भारताचा सुपरमॅन ! काय अफलातून विजय..!"

### सचिनने शेअर केले फोटो

या पोस्टसोबत सचिनने दोन फोटो शेअर केले आहेत, एकात संपूर्ण 'टीम इंडिया' विजयाचा जल्लोष करताना दिसते आणि दुसऱ्या फोटोत आहे, तुफान कामगिरी बजावणारा महम्मद सिराज ! सचिनच्या या पोस्टवरून स्पष्ट होते की, त्याने सिराजला 'सुपरमॅन' असे विशेषण दिले आहे.

### युवराज सिंगची जबरदस्त पोस्ट

'टीम इंडिया' च्या ऐतिहासिक विजयावर माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंग याने एक खास पोस्ट करत लिहिले की, "खरं आत्मविश्वास कसा असतो, हेच यावरून दिसून येतं. आपल्या मुलांनी टेस्ट क्रिकेटमध्ये ज्या पद्धतीने पुनरागमन केलं, तो खरा 'कमबॅक' आहे, भारतानं ओव्हलवर लढत लढत ऐतिहासिक विजय मिळवला." या पोस्टमध्ये महम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा आणि आकाशदीप यांच्या प्रदर्शनाचे त्याने खास कौतुक केले आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाचेही अभिनंदन केले आहे.

### नवोदित खेळाडूंचा धमाका!

भारताचा हा संघ नवोदित खेळाडूंनी खचाखच भरलेला आहे. रोहित शर्मा, विराट कोहली, आर. अश्विन यांच्या अनुपस्थितीत नवोदित खेळाडूंनी अफलातून कामगिरी बजावली आहे. शुभमन गिल या नवोदित कर्णधाराने अचूक निर्णय घेऊन आणि योग्य त्या पद्धतीने व्यूहरचना रचून कर्णधार पदाची, नेतृत्वाची चुणूक दाखवली आहे. पुढील काही वर्षे भारताचा संघ संपूर्ण जगावर अधिराज्य गाजवे यात शंका नाही असेही काही ज्येष्ठ खेळाडूंनी म्हटले आहे.

### सिराज कधीच निराश करत नाही : गांगुली

भारतीय संघाचे माजी कर्णधार आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांनी भारताच्या थरारक विजयानंतर प्रतिक्रिया देताना लिहिले आहे, की, टीम इंडियाचा जबरदस्त विजय. महम्मद सिराज हा असा खेळाडू आहे, जो जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात भारताच्या संघाला कधीच निराश करत नाही. प्रसिद्ध कृष्णा, आकाशदीप, यशस्वी जैस्वाल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर आणि ऋषभ पंत या सर्वांनीच बहारदार आणि अफलातून कामगिरी केली. या तरुण संघात सातत्य आहे आणि तीच त्यांची खरी ताकद आहे, असे गांगुली यांनी म्हटले आहे.

### 'काय कमबॅक होता हा

भारताच्या ऐतिहासिक विजयानंतर माजी सलामीवीर शिखर धवन यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवर लिहिले आहे की, 'काय कमबॅक होता हा '.. महम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी अफलातून कमाल दाखवली. दोघांचा आत्मविश्वास आणि शांतपणे खेळण्याची शैली कमाल होती, सगळे काही परफेक्ट! धवन यांनी पुढे म्हटले आहे की, 'शुभमन गिल, तुझे नेतृत्व अगदी पॉइंटवर होते आणि अजूनही तुझ्याकडून खूप काही अपेक्षित आहे. हा सामना पाहून आनंद झाला. तुमच्यापैकी प्रत्येकावर मला अभिमान आहे, असेही शिखर धवन यांनी म्हटले आहे.

### पंतचं भावनिक प्रतिक्रिया!

दुखापतीमुळे अखेरच्या कसोटीमधून बाहेर राहिलेल्या ऋषभ पंतने आपल्या भावना इंस्टाग्रामवर शेअर करत लिहिले आहे की, ही टीम परिस्थितींशी लढणारी, समर्पित आणि देशासाठी काहीही करण्याची तयारी ठेवणारी आहे. या दौऱ्यात खूप त्याग करावा लागला. पण, त्यापेक्षा अधिक काहीतरी मिळाले. आपल्या समर्थक आणि संपूर्ण सपोर्ट स्टाफचे मनापासून आभार !

### विराट कोहलीला आनंद..

दरम्यान, भारताच्या ऐतिहासिक विजयानंतर विराट कोहलीनेही त्याच्या सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना लिहिले आहे की, 'टीम इंडिया' चा ऐतिहासिक विजय ! सिराज आणि प्रसिद्धमुळे भारताला हा जबरदस्त विजय मिळवता आला. विशेषतः सिराजबद्दल सांगायचे झाले, तर त्याने स्वतःला पूर्णपणे संघासाठी झोकून दिले. त्याच्यासाठी मला खूप आनंद होतोय !

**काळजी घेण्याच्या सूचना** पालिकेकडून महत्वाच्या रस्त्यांची अभियंत्यांवर जबाबदारी

# उत्सवाच्या काळात रस्त्यांकडे लक्ष

## उत्सवाच्या काळात खड्डे पडू नयेत

| पुणे |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गणेशोत्सव तसेच पाठोपाठ येत असलेल्या नवरात्रोत्सवात नागरिकांना तसेच मंडळांना त्रास होऊ नये, यासाठी महापालिकेच्या पथ विभागाने शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. महत्वाची मंडळे असलेल्या आणि मिरवणूक काढण्यात येणाऱ्या रस्त्यांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना अभियंत्यांना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक अभियंत्यावर जबाबदारी निश्चित करुन संबधित रस्त्यावर उत्सवाच्या काळात खड्डे पडू नयेत, यासाठी विशेष काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**



महापालिकेचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी ही माहिती दिली. गणेशोत्सवासाच्या काळात रस्त्यावर कोणतेही अडथळे निर्माण होऊन उत्सवात विघ्न येऊ नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. ज्या मार्गावर गणेशोत्सवासाठी मोठी गर्दी होते. तसेच मिरवणुका काढल्या जातात.अशा लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, नेहरू रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता तसेच शास्त्री रस्त्यासह अन्य महत्वाच्या रस्त्यांवर उत्सवाच्या काळात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी महापालिका प्रयत्न करणार आहे. या रस्त्यांवरील त्रुटी दूर करण्यासाठी महापालिकेच्या पथ विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार असून हे अधिकारी दररोज त्यांना जबाबदारी दिलेल्या रस्त्याची पाहणी करुन त्यातील त्रुटी दूर करणार आहेत.उत्सव साजरा करताना मंडळांना आवश्यक असलेली आणि महापालिकेच्या माध्यमातून केली जाणारी कामे पूर्ण करण्यास प्राधान्यक्रम राहणार आहे. यासाठी संबधित मंडळांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गणेशोत्सवापूर्वी तसेच उत्सवाच्या काळात संबधित अभियंत्यावर या रस्त्याची दररोज पाहणी करुन त्यामध्ये आढळलेल्या अडचणी दूर करण्याची जबाबदारी राहणार असल्याचे पावस्कर यांनी सांगितले.गणेशोत्सव तसेच नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने महापालिकेने मंडळांसाठी नियमावली जाहीर केली आहे. मांडव टाकण्यासाठी खोदलेले खड्डे स्वखर्चाने बुजवावेत, उत्सवानंतर तीन दिवसांत मंडप, सजावट तसेच इतर अतिक्रमण काढून तातडीने जागा मोकळी करावी अशा सूचनांचा या नियमावलीत समावेश आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या नियमावलीमध्ये २०२२ पासून पाच वर्षापर्यंत मंडप, कमानी यासाठी परवानगी घ्यावी लागणार नाही. नवीन गणेश मंडळांना मात्र २०१९ च्या नियमावलीनुसार परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच विविध परवानगी घेण्यासंदर्भात पोलीस, महापालिका यांनी एक खिडकी योजना सुरु करणार आहे.मंडपासाठी खोदलेले खड्डे सिमेंट क्रॉंक्रिटने दुरुस्त करणे बंधनकारक असणार आहे. नागरिकांना वाहतुकीला अडथळा होणार नाही, तसेच त्यांना ध्वनिप्रदूषणाचा त्रास होणार नाही याची काळजी मंडळाने घ्यावी, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. तसेच तक्रारीसाठी महापालिकेने हेल्पलाईन सुरु केली आहे. १८०० १०३ ०२२२, मोबाईल अँप : , व्हॉट्स अप नंबर : ९६८९९००००२ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मंडळांसाठी नियमावली

मांडव टाकण्यासाठी खोदलेले खड्डे स्वखर्चाने बुजवावेत, उत्सवानंतर तीन दिवसांत मंडप, सजावट तसेच इतर अतिक्रमण काढून तातडीने जागा मोकळी करावी अशा सूचनांचा या नियमावलीत समावेश आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या नियमावलीमध्ये २०२२ पासून पाच वर्षापर्यंत मंडप, कमानी यासाठी परवानगी घ्यावी लागणार नाही.

# शिक्षकांनी आहाराची तपासणी करावी

## विषबाधेच्या घटना टाळण्यासाठी शिक्षण विभागाचा मोठा निर्णय

| पुणे |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहारातून विद्यार्थ्यांना विषबाधा होऊ नये यासाठी शिक्षण विभागाने कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यात पोषण आहारातून विषबाधा झाल्यास कारवाईचे स्वरूप निश्चित करण्यात आले असून, तपासणीवेळी पुरवठादाराचे गोदाम अस्वच्छ आढळल्यास पहिल्या वेळी ५० हजार रुपये, तर दुसऱ्या वेळी एक लाख रुपये दंड केला जाणार आहे.**



तसेच, निकृष्ट धान्यामुळे विषबाधा झाल्याचा प्रयोगशाळा अहवाल असल्यास पुरवठादारावर गुन्हा दाखल करून त्याची देयके न देण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यात येतो. त्यासाठी शाळांमध्ये तांदूळ, धान्य पुरवण्यासाठी ठेकेदाराची नियुक्ती निविदेद्वारे करण्यात येते. शाळा व्यवस्थापन समितीमार्फत महिला बचत गट, महिला, स्वयंपाकी, मदतनीस यांच्यामार्फत अन्न शिजवून पोषण आहाराचे वाटप करण्यात येते.विषबाधेच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आल्याच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने मानक कार्यपद्धती निश्चित करून परिपत्रक प्रसिद्ध केले.अन्नातून विषबाधा होण्यामागे आहार तयार करताना पुरेशी काळजी न घेणे, निश्चित केलेल्या पाककृतीनुसार आहार तयार न करता वेगळ्या पद्धतीने करणे, आहार उघड्यावर शिजवणे, स्वयंपाकगृहात स्वच्छतेचा स्वच्छ पाण्याची व्यवस्था नसणे, उष्णतेमुळे अन्न खराब होणे अशी विविध कारणे आहेत.

### विषबाधा होण्यामागे आहार

शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक-शिक्षक, स्वयंपाकी-मदतनीस, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, अधीक्षक, गोदाम अशा स्तरांसाठीच्या जबाबदाऱ्या निश्चित करून मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या आहेत. तसेच विषबाधेसारखी घटना झाल्यानंतर आरोग्य विभाग, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या साहाय्याने करावयाच्या उपाययोजनांबाबतची माहिती देण्यात आली आहे.

प्रारूप विकास आराखडा

अनेक विधी विद्यार्थी, स्थानिक नागरिक व विविध संघटनांचा पाठपुरावा

# महापालिकेचा विकास आराखडा होणार मराठीत!

## राज्य शासनाकडून महापालिकेला आदेश

। पिंपरी-चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने तयार केलेला प्रारूप विकास आराखडा इंग्रजी भाषेत प्रसिद्ध केल्याने मराठी भाषिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. अनेक विधी विद्यार्थी, स्थानिक नागरिक व विविध संघटनांनी यासंदर्भात राज्य शासन, महापालिका प्रशासन, तसेच लोकप्रतिनिधींकडे सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश आले असून, राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने महापालिका आयुक्तांना विकास आराखडा मराठीत प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत.**



वर्ष २०४१ पर्यंतची लोकसंख्या लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने तयार करण्यात आलेला प्रारूप विकास आराखडा महापालिकेच्या संकेतस्थळावर इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करण्यात आला होता. नागरिकांच्या हरकती व सूचना घेण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. त्या कालावधीत तब्बल ४९,५७० हरकती प्राप्त झाल्या. मात्र, इंग्रजी भाषेमुळे सामान्य मराठी भाषिक नागरिकांना आराखड्याचे पूर्ण आणि अचूक आकलन होण्यात अडचणी आल्या. त्यामुळे आराखडा जर मराठीत उपलब्ध झाला असता, तर हरकतींची संख्या आणखी वाढली असती, असे मत नागरिकांकडून व्यक्त करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने महापालिका आयुक्तांना विकास आराखडा मराठीत प्रसिद्ध करण्याच्या सूचना दिल्या असून, त्यानुसार लवकरच तो मराठी भाषेत प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे.

### राजभाषा अधिनियमाची पायमल्ली

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील कलम ४(१) नुसार राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी मराठी भाषेत अधिकृत व्यवहार, अहवाल व कागदपत्रे प्रकाशित करणे बंधनकारक आहे. याशिवाय, महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ नुसार सर्व महापालिका व नगरपरिषदांना प्रशासकीय कामकाज मराठीतूनच करण्याचे स्पष्ट आदेश शासनाने दिले आहेत. मात्र, हे नियम व आदेश दुर्लक्षित करून नगररचना विभागाने आराखडा इंग्रजी भाषेत प्रसिद्ध केला, यावर नागरिकांनी तीव्र आक्षेप घेतला होता.


या संदर्भात विधीचा विद्यार्थी अनीश काळभोर म्हणाले, "विकास आराखडा मराठीत प्रसिद्ध झाला असता, तर अधिकाधिक नागरिकांना त्याची माहिती होऊन जनसामान्यांच्या मतांचा योग्य विचार झाला असता. आता तरी राज्य शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करून महापालिका प्रशासनाने आराखडा मराठीत प्रसिद्ध करावा."

# नदीतील पाणी शुद्ध करण्यासाठी तब्बल तीन कोटींचे रसायन

## पवना, इंद्रायणी नदीतील गढूळतेमुळे महापालिकेचा निर्णय • आयुक्त शेखर सिंह यांनी प्रस्तावाला दिली मंजुरी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पावसाळ्यामुळे पवना आणि इंद्रायणी नदीतील पाण्याची गढूळता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे नदीतून थेट उचलले जाणारे पाणी शुद्ध करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेला अधिक प्रमाणात रसायनांचा वापर करावा लागत आहे. यासाठी तब्बल ३ कोटी १३ लाख १२ हजार ४९६ रुपयांचा खर्च होणार असून, या प्रस्तावाला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मंजुरी दिली आहे.**





महापालिका क्षेत्रातील नागरिकांना दररोज स्वच्छ व सुरक्षित पाणी पुरवठा करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये विविध प्रक्रिया राबविल्या जातात. शहराचा पाणीपुरवठा मुख्यतः मावळातील पवना व आंद्रा धरण यांवर अवलंबून आहे. पवना धरणातून पाणी नदीमार्गे रावेत बंधाऱ्यातून उचलले जाते आणि निगडी सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात त्यावर प्रक्रिया होते. तसेच, आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीत सोडून निघोजे बंधाऱ्यातून पंपाद्वारे उचलले जाते व चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात पोहोचवले जाते.

पावसाळ्यात थेट नदीतील गढूळ पाणी पावसाळ्याच्या चार महिन्यांत महापालिका थेट पवना आणि इंद्रायणी नदीतील पाणी उचलते. या काळात पाण्यातील गढूळपणा लक्षणीय वाढतो. त्यामुळे पाणी शुद्ध करण्यासाठी पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड या रसायनाचे द्रवरूप व पावडर स्वरूपातील अधिक प्रमाणात वापर करावा लागतो.


पाणीपुरवठा विभागाने रसायन खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. निविदेनुसार गरज भासल्यास ठराविक दराने वाढीव रसायन पुरवण्याची जबाबदारी ठेकेदारांवर टाकण्यात आली आहे. त्यानुसार, एसव्हीएस केमिकल्स कार्पा एलएलपी आणि गुजरात अल्कलीज ॲण्ड केमिकल्स यांच्याकडून रसायने खरेदी केली जाणार आहेत.

"पावसाळ्याचे चार महिने थेट नदीतून पाणी उचलले जाते. त्यामुळे पाण्याचा गढूळपणा जास्त असतो. पाण्यातील गढूळपणा कमी करण्यासाठी रसायनाचा अधिक वापर करावा लागतो. जलशुद्धीकरण प्रक्रियेनंतरच नागरिकांना सुरक्षित पाणी वितरित केले जाते."
**—अजय सूर्यवंशी, सह शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग**

### मुख्य मुद्दे –

- पवना, इंद्रायणी नदीतील गढूळतेत वाढ
- पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड रसायनाचा वापर
- तीन कोटींच्या रसायन खरेदीला स्थायी समितीची मंजुरी
- जलशुद्धीकरणासाठी निविदा प्रक्रियेनंतर ठेकेदारांची निवड

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



'स्टेट'मेंन्ट
राहुल जगताप

### वासनेला कसे जिंकता येईल ?

किती‌ही विद्वान् पंडित जरी झाला तरी त्याला स्वत:ला अनुभव आल्यावाचून ज्ञान सार्थकी लागले असे होत नाही. पोथी ऐकून ज्याला वैराग्य आले त्यालाच पोथी खरी कळली असे म्हणावे. पोथीत सांगितलेले ऐकून ते जो आचरणात आणतो तोच खरा श्रोता होय. वेदान्त हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे, तर त्याचा खरा उपयोग. म्हणूनच सर्व प्रचीतींमध्ये आत्मप्रचीती ही उत्तम होय. जो भगवंताला शरण गेला त्याच्यापाशी शब्दज्ञान नसले तरी, त्याला मिळवायचे काहीच उरत नाही. जो शब्दज्ञानाच्या मागे जातो त्याचा अभिमान बळावतो. जो शब्दज्ञानी नसतो त्याला अभिमान नसेलच असे नाही. अज्ञानी माणसालाही अभिमान असतो, परंतु तो घालविणे सोपे असते. ' सद्गुरूला शरण जा ' म्हटले, तर अज्ञानी माणूस मुकाट्याने शरण जाईल; त्याला शंका येणार नाही. काशीला जाणारे पुष्कळ रस्ते आहेत; पण कोणत्याही रस्त्याने जायचे तरी आपले घर सोडल्याशिवाय जाता येत नाही. हे जसे खरे, तसे कोणत्याही साधनात वासना बाळगून, किंवा ती देवापासून निराळी ठेवून भागणार नाही. ती देवाची करायला, तिला मारायला, देवाचे स्मरण पाहिजे. भगवंताचे होणे हे माझे या जन्मातले मुख्य काम आहे असे समजावे. मी भगवंताचा कसा होईन याचा सारखा रात्रंदिवस विचार करावा. मी दुसऱ्या कोणाचा नाही ही खात्री असली म्हणजे भगवंताचे होता येते.

आपले मन वासनेच्या अधीन होऊन तात्पुरत्या सुखाच्या मागे गेल्यामुळे थप्पड खाऊन परत येते. लोक समजतात तितके वासनेला जिंकणे कठीण नाही. आपली वासना कुठे गुंतते ते पाहावे. आपल्या अंगातले रक्त काढून ते तपासून, आपल्याला कोणता रोग झाला आहे हे डॉक्टर पाहातात, त्याचप्रमाणे आपले चित्त कुठे गुंतले आहे हे आपण पाहावे; तो आपला रोग आहे. जी गोष्ट आपल्या हातात नाही तिच्याविषयी वासना करणे वेडेपणाचे आहे, हे ध्यानात ठेवावे. म्हणूनच, विचार आणि नाम यांनी वासनेला खात्रीने जिंकता येईल. मग आपले कर्तेपण आपोआप मरून जाईल. हिमालयावर ज्या वेळी आकाशातून बर्फ पडते त्या वेळी ते अगदी भुसभुशीत असते. पण ते पडल्यावर काही काळाने दगडापेक्षाही घट्ट बनते. त्याचप्रमाणे, वासनाही सूक्ष्म आणि लवचिक आहे, पण आपण तिला देहबुद्धीने अगदी घट्ट बनवून टाकतो. मग ती काढणे फार कठीण जाते. भगवंताची वासना ही वासना होऊच शकत नाही. ज्याप्रमाणे कणीक अनेक वेळा चाळून गव्हाचे सत्त्व काढतात, त्याप्रमाणे विषयाची सर्व वासना नाहीशी झाल्यावर जी उरते, ती भगवंताची वासना होय.

**बोधवचन:- वासना मारायला भगवंताचे अधिष्ठान हा एकच उपाय होय.**

# रोडकरी, टोलकरी, गडकरी, नेमकं कुणाचं बरं भलं करी?



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**संपूर्ण देशामध्ये रस्त्यांचं जाळं उभारूनही कशाचंही क्रेडिट न घेणारा सर्वसामान्यांचा साधासुधा मंत्री म्हणजे नितीन गडकरी.. ही बहुतेक सर्वसामान्यांच्या मनातील भावना आहे. गडकरींचे भाषण जर कान देऊन ऐकलं, तर ते काही लाख कोटींच्या खाली बोलतंच नाहीत..त्यांनी सांगितलेले आकडे मांडायचे म्हटले तरी डोकं चक्रावून जातं..प्रत्यक्षात, त्या आकड्यांचा फायदा गोरगरिबांना होतो का श्रीमंतांना हा खरंतर चर्चेचा विषय आहे !**




### देशाच्या विकासासाठी पायाभूत सुविधा..

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधा मजबूत करत असल्याचं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. आंध्र प्रदेशात मंगलागिरी इथं पाच हजार २३३ कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीच्या २७२ किलोमीटर लांबीच्या २९ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केल्यानंतर गडकरी बोलत होते. सहज तो परिसर डोळ्यासमोर येऊन गेला आणि गडकरींचे आकडेही पिंगा घालू लागले. गेल्या अकरा वर्षात राष्ट्रीय महामार्गांची लांबी १२० टक्क्यांनी वाढली आणि २०१४ मध्ये असलेले ४ हजार किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग लांबी आता ८ हजार ७०० किलोमीटर झाल्याची माहिती गडकरी यांनी दिली.. पुन्हा एकदा डोकं चक्रावण्याची वेळ!

### जास्त टक्क्यांवरून कमी टक्क्यांवरील उड्या..

सुधारित रस्ते, पायाभूत सुविधांमुळे, दळणवळणाचा खर्च १६ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी झाला असून डिसेंबर २०२५ पर्यंत या खर्चात आणखी नऊ टक्क्यांपर्यंत घट होण्याचा अंदाज आहे, असं त्यांनी सांगितलं. गडकरी नेहमी अशीच चकित करणारी आकडेवारी समोर असलेल्यांच्या तोंडावर फेकून मारतात. लाखो, कोटी रुपयांच्या आकड्यांची गुंतवणूक सांगताच मंडळी हबकून जातात.

### पर्यावरणाची किंमत मोजावी..

गडकरी काही प्रकल्प प्रत्यक्षात आणतात ही, मात्र त्यासाठी पर्यावरणासह मोजली जाणारी किंमत ते सांगत असलेल्या आकड्यांपेक्षा खूपच जादा असते. यात ज्यांना त्रास होतो, ती मंडळी त्यांनी उभारलेल्या प्रकल्पावर पूर्णपणे कधीच प्रवास करत नाहीत. मग हे रस्ते बांधण्याचे प्रकल्प कोणासाठी ? कशासाठी ? हे प्रश्न उरतातच, नाही का?

### सर्वसामान्यांचा बादरायणी संबंध..

हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला केला, तर सर्वसामान्य जनतेला फायदा होतो, हे बादरायणी संबंधाने सिद्ध होते. बारदायणी संबंध म्हणजे काय? खेड्यामध्ये सांगितले जाते, की तुझ्या बैलगाडीचे चाक माझ्या दारा समोरील बोरीच्या झाडासारख्या झाडाने तयार केले आहे, म्हणून मी तुझा नातेवाईक आहे. थोडक्यात काय, वाटेल ते ! मुद्दा आहे, तो धनदांडगे आणि उद्योजकांसाठी गडकरी यांचा हा सर्व खटाटोप सुरू आहे, हे गरिबांच्या लक्षात आलेले आहे.

### टोलचे झोल होताहेत, त्याचे काय?

आजपर्यंत जे महामार्ग झाले त्याच्या टोलचे झोल, त्याचे ऑडिट कधी आणि कसे झाले यांचा पत्ता नाही. मार्ग तयार करण्याअगोदरच काही ठिकाणी वाहनांकडून पैसे घेतले..बरं चौपदरीचे आठपदरी करण्याचे कारण किती आवश्यक होते ? त्याचा नीट प्रचार, प्रसार नाही. समृद्धीसारखे महामार्ग किंवा शक्तीपीठ सारखा महामार्ग निर्माण करण्याची खरंच आवश्यकता आहे का ? नागपूर ते मुंबईसाठी रेल्वे, विमानाने वाहतूक - माल वाहतूक उपलब्ध आहे. त्याची क्षमता वाढवणे सोपे होते, की नव्याने जमिनी सम्पादित करून जनक्षोभ निर्माण करून केवळ ठेकेदार पोसण्यासाठी महामार्ग निर्माण करायचे, हे कोणते शास्त्र आहे?

### गांजा मारला, तरी कल्पना सुचतात..

बरं, नितीन गडकरी अभ्यासू आहेत..असतीलही ! मात्र, वाहन अभियांत्रिकी, बांधकाम अभियांत्रिकी, रस्ते सुरक्षाशास्त्र , या मागचे अर्थकारण, महसूल नियम या सगळ्यात ते तज्ज्ञ नाहीत, हे वारंवार सिद्ध झाले आहे. अफूची,गांज्याची गोळी मारली तरी अनेक कल्पना सुचतात म्हणे, त्यासाठी नितीन गडकरी असण्याची आवश्यकता नाही. रस्ते ज्या प्रकारचे तयार केले जातात, त्या प्रकरची वाहने नाहीत. वाहने आहेत, तिथे रस्ते नाहीत. वाहने सुरक्षित करण्यासाठी जादा खर्च करावा लागतो आणि तशी वाहने आणली, तर रस्ते सर्वत्र उत्तम आहेत अशी अवस्था नाही.

### केवळ 'खांदा आणि बांधा' चे तत्व..

सुरक्षायंत्रणा पूर्ण ताकदीने रस्त्यावर अपघात होऊ नये किंवा झाला, तर उपाय करण्यासाठी उपलब्ध नाही. केवळ 'खांदा आणि बांधा' या एका तत्वावर पैसे कमवण्याचा हा राष्ट्रीय उपक्रम आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उत्तम केली, रेल्वे अधिक सक्षम केली तर रस्त्याचे हे विकासनाट्य संपेल. पर्यावरणाचा जो ऱ्हास केला जात आहे, तो थांबेल. गावांची संस्कृती संपत चालली आहे, ती वाचेल. भाषा, प्रांत हे भेद ज्या ताकदीने समोर येत आहेत, ते संपतील. विकासाला समृद्ध, शांत, प्रसन्न मानवी चेहरा असला पाहिजे. बुभूक्षित, हपापलेला, हावरट चेहरा नको आहे. राज्य, मानवी जीवन भकास करण्याचा विकास नको, हे गडकरींनी जरा लक्षात घ्यावे !

### वाहतूक सुरळीत, पण..

नितीन गडकरी यांची दूरदृष्टी, त्यांच्या डोक्यातील कल्पकता, सरकारचे पैसे वाचवण्यासाठी वेगळे काही करण्याची हातोटी, आणि नरेंद्र मोदी यांचा विकासाचा चेहरा लक्षात घेऊन आखलेली कामे ! देशाचा 'विकास पुरुष' म्हणून गडकरी यांची प्रतिमा घडत चालली आहे, पण, श्रीमंतांचे भले करण्याच्या नादात गोरगरिबांचे हात होऊ नयेत, आणि काही काळानंतर त्यांच्यावर 'भकास पुरुष' म्हणून शिक्का बसू नये, हीच खरोखर प्रार्थना आहे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

माफी मागावी

## वक्तव्य अर्धं कापून टीव्हीवर दाखवणं बंद करा

# परिणय फुके यांनी शिवसेनेला डिवचलं

## मुख्यमंत्री फडणवीसांचे स्पष्टीकरण

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महायुतीत सारं काही आलबेल नसल्याचं चित्र अलीकडच्या काही दिवसांमध्ये पाहायला मिळत आहे. तिन्ही पक्षांच्या नेत्यांमधील वाद अधून मधून निदर्शनास येत असतानाच भाजपा आमदार परिणय फुके यांनी शिवसेनेला (शिंदे) डिवचलं आहे. ‘शिवसेनेचा बाप मीच’ असं वक्तव्य भंडारा येथील भाजपाच्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलत असताना परिणय फुके यांनी केलं आहे.**



फुके यांच्या या वक्तव्यामुळे शिवसेना (शिंदे) व भाजपात वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेनेच्या भंडाऱ्यातील पदाधिकाऱ्यांनी आज (४ ऑगस्ट) पत्रकार परिषद घेऊन फुके यांनी माफी मागावी अशी मागणी केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेवर सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, “तुम्ही प्रसारमाध्यमं अलीकडच्या काळात नेत्यांची वक्तव्ये कापून-कापून दाखवता.

ती वक्तव्ये दिवसभर टीव्हीवर दाखवून एकेक दिवस काढता. तुम्ही हा नवीनच प्रकार सुरु केला आहे जो बंद करायला हवा. मला कल्पना होती की तुम्ही मला यावर प्रतिक्रिया विचारणार त्यामुळे मी आधीच या घटनेची माहिती घेतली आहे.मुख्यमंत्री म्हणाले, “आमदार परिणय फुके यांनी म्हटलं होतं की ‘कुठल्याही गोष्टीचं श्रेय आईला दिलं जातं. मात्र, काही चुकलं तर बापावर ढकललं जातं, खापर फोडलं जात. भंडाऱ्यातील शिवसेनेचे लोक काहीही झालं तर माझ्यावर खापर फोडतात. मी त्यांचा बाप आहे का?’ फुके यांचं हे वक्तव्य तुम्ही कापून दाखवत आहात. त्यांच्या संपूर्ण वक्तव्याचा अर्थ नीट पाहिला तर शिवसेनेचा बाप मीच आहे असं त्यांनी कुठेही म्हटलेलं नाही. खरंतर तसं वक्तव्य करावं की करू नये हा त्यांचा विषय आहे. मात्र, त्यांचं वक्तव्य अर्धं कापून टीव्हीवर दिवसभर दाखवणं बंद करा.”परिणय फुके शिवसेनेबद्दल (शिंदे) जे काही बोलले ती अहंकारी भाषा आहे. अशा वक्तव्याचा आणि आमदाराचा आम्ही निषेध करतो”, अशा शब्दांत शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच आमदार परिणय फुके यांनी १२ तासांच्या आत माफी मागावी, अशी मागणी देखील केली आहे. “सैराट सोडलेल्या वळूला भाजपा पक्षश्रेष्ठींनी आवर घालावी, अन्यथा शिवसेना (शिंदे गट) प्रतिउत्तर देणार” असल्याचा दम शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख संजय कुंभलकर यांनी भंडाऱ्यातील

### भाजपा पक्षश्रेष्ठींनी आवर घाला

सैराट सोडलेल्या वळूला भाजपा पक्षश्रेष्ठींनी आवर घालावी, अन्यथा शिवसेना (शिंदे गट) प्रतिउत्तर देणार” असल्याचा दम शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख संजय कुंभलकर यांनी भंडाऱ्यातील विश्रामगृहात घेतलेल्या पत्रपरिषदेत दिला.महायुतीत सारं काही आलबेल नसल्याचं चित्र अलीकडच्या काही दिवसांमध्ये पाहायला मिळत आहे.

विश्रामगृहात घेतलेल्या पत्रपरिषदेत दिला.फुके यांच्या या वक्तव्यामुळे शिवसेना (शिंदे) व भाजपात वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेनेच्या भंडाऱ्यातील पदाधिकाऱ्यांनी आज (४ ऑगस्ट) पत्रकार परिषद घेऊन फुके यांनी माफी मागावी अशी मागणी केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेवर सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, “तुम्ही प्रसारमाध्यमं अलीकडच्या काळात नेत्यांची वक्तव्ये कापून-कापून दाखवता. मला कल्पना होती की तुम्ही मला यावर प्रतिक्रिया विचारणार त्यामुळे मी आधीच या घटनेची माहिती घेतली आहे.मुख्यमंत्री म्हणाले, “आमदार परिणय फुके यांनी म्हटलं होतं की ‘कुठल्याही गोष्टीचं श्रेय आईला दिलं जातं. मात्र, काही चुकलं तर बापावर ढकललं जातं, खापर फोडलं जात. भंडाऱ्यातील शिवसेनेचे लोक काहीही झालं तर माझ्यावर खापर फोडतात. मी त्यांचा बाप आहे का?’ फुके यांचं हे वक्तव्य तुम्ही कापून दाखवत आहात. त्यांच्या संपूर्ण वक्तव्याचा अर्थ नीट पाहिला तर शिवसेनेचा बाप मीच आहे असं त्यांनी कुठेही म्हटलेलं नाही. खरंतर तसं वक्तव्य करावं की करू नये हा त्यांचा विषय आहे. मात्र, त्यांचं वक्तव्य अर्धं कापून टीव्हीवर दिवसभर दाखवणं बंद करा.”परिणय फुके शिवसेनेबद्दल (शिंदे) जे काही बोलले ती अहंकारी भाषा आहे. अशा वक्तव्याचा आणि आमदाराचा आम्ही निषेध करतो”, अशा शब्दांत शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला.

# पोलिसांना धमकावणाऱ्यांनी शिकवू नये

## मंत्री मेघना बोर्डीकर यांचे आमदार रोहित पवार यांना प्रत्युत्तर

| मुंबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जिंतूर तालुक्यातील बोरी येथे एका कार्यक्रमात पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी एका ग्रामविकास अधिकाऱ्याला ‘कानाखाली वाजवीन’, असे वक्तव्य केल्याने नवा वाद उद्भवला आहे. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी ‘एक्स’वरून बोर्डीकर यांच्यावर टीका केली. तर ज्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन पोलिसांना धमकावले अशांनी आम्हाला शिकवू नये, असे उत्तर पालकमंत्री बोर्डीकर यांनी दिले आहे.**



जिंतूर विधानसभा मतदारसंघातील बोरी या गावी घरकुल लाभार्थ्यांची सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुरही उपस्थित होते. या कार्यक्रमाची चित्रफीत समाजमाध्यमावर प्रसारित होत आहे. त्यात एका ग्रामविकास अधिकाऱ्याला पालकमंत्री बोर्डीकर या झापत होत्या. ‘तुला पगार कोण देते, यापुढे अशी चमचेगिरी चालणार नाही. तू गावात काय म्हणाल्या.दरम्यान, ही चित्रफीत

### पवारांनी आम्हाला शिकवू नये

मागचे पुढचे संदर्भ न देता ते दाखवण्यात आले आहे. संबंधित ग्रामसेवक विधवा महिलांकडे पैसे मागून त्यांना ग्रामपंचायतीत लुडबुड करणाऱ्या एका स्थानिक कार्यकर्त्याकडे पाठवून त्यांचा छळ करत होता. जनसामान्यांना त्रास देणारे कर्मचारी असतील तर त्यांच्याविरुद्ध संताप व्यक्त होणारच. महिला भगिनींच्या तळमळीतून माझे ते वक्तव्य आहे.

आमदार रोहित पवार यांनी आपल्या ‘एक्स’ माध्यमावर प्रसारित करत ‘सभागृहात रमी खेळणारे... पैशाच्या बॅगा भरणारे... डान्सबार चालवणारे... या मंत्र्यांमध्ये आता थेट अधिकाऱ्यांच्या कानाखाली वाजवणाऱ्यांची भर पडली आहे,’ असे नमूद केले. त्याला बोर्डीकर यांनी प्रत्युत्तर दिले आहे. अर्धवट चित्रफीत प्रसारित करून रोहित पवार यांनी दिशाभूल केली आहे. पोलीस ठाण्यात जाऊन आमदारांशी नीट वाग असे पोलीस अधिकाऱ्यांना धमकावणाऱ्या रोहित पवारांनी आम्हाला शिकवू नये, असेही बोर्डीकर म्हणाल्या. आपल्या वक्तव्याची मोडतोड करण्यात आली आहे.

भारताला धमकी | भारतावर टॅरिफ मोठ्या प्रमाणात वाढवण्याची धमकी

# डोनाल्ड ट्रम्प यांची पुन्हा भारताला धमकी!

## सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर धमकी



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताला धमकी दिली आहे . ट्रम्प यांनी भारत हा रशियाकडून तेल खेरदी करत असल्याच्या मुद्द्यावर ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत धमकी दिली आहे."भारत फक्त मोठ्या प्रमाणात रशियाकडून तेल खरेदीच करत नाही, तर त्यानंतर ते विकत घेतलेल्या तेलाचा बराचसा भाग मोठ्या नफ्याच्या बदल्यात खुल्या बाजारात विकत आहेत. रशियन वॉर मशिनमुळे युक्रेनमध्ये किती लोक मृत्युमुखी पडत आहेत याबद्दल त्यांना कसलीही फिकीर नाही," असे डोनाल्ड ट्रम्प त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत.**

तसेच ट्रम्प यांनी त्यांच्या पोस्टमध्ये मोठी धमकी देखील दिली आहे. "यामुळे, मी भारताकडून अमेरिकेला दिल्या जाणाऱ्या टॅरिफमध्ये लक्षणीय रीतीने वाढ करणार आहे," असे ट्रम्प म्हणाले आहेत. मात्र यावेळी त्यांनी ही नवीन वाढ कोणत्या स्वरूपात असेल याबद्दल कोणताही खुलासा केलेला नाही.काही दिवसांपूर्वी भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली होती. तसेच रशियाकडून तेल खरेदी केली जात असल्याच्या कारणावरून भारतावर दंड लादण्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ३० जुलैला केली. हा दंड किती असेल याबद्दल कोणतीही स्पष्टता देण्यात आलेली नव्हती. यानंतर काही दिवसांतच त्यांनी पुन्हा पोस्ट करत भारताला धमकी दिली आहे.

भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारतावर टीका करत आहेत. यातच ट्रम्प यांनी दावा केला होता की, भारत रशियाकडून तेल खरेदी थांबवणार असल्याचे त्यांच्या कानावर आले आहे. मात्र, एएनआय या वृत्तसंस्थेला सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भारतीय तेल कंपन्यांची रशियाकडून तेल खरेदी चालूच आहे. त्यांच्या पुरवठ्याचे निर्णय किंमत, कच्च्या तेलाचा दर्जा, इन्व्हेंटरीज, लॉजिस्टिक्स आणि इतर आर्थिक घटकांवर अवलंबून असतात, असे सूत्रांनी सांगितले होते."या आव्हानात्मक परिस्थितीत, ८५% सह कच्च्या तेलाच्या आयातीवर अवलंबून असलेला जगातील तिसरा सर्वात मोठा इंधन ग्राहक म्हणून भारताने आंतरराष्ट्रीय नियमांचे पूर्णपणे

### तेलाच्या आयातीवर अवलंबून

"या आव्हानात्मक परिस्थितीत, ८५% सह कच्च्या तेलाच्या आयातीवर अवलंबून असलेला जगातील तिसरा सर्वात मोठा इंधन ग्राहक म्हणून भारताने आंतरराष्ट्रीय नियमांचे पूर्णपणे पालन करून परवडणारे इंधन खरेदी करण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताला धमकी दिली आहे .

पालन करून परवडणारे इंधन खरेदी करण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलले आहे", असे सूत्रांनी सांगितल्याचे वृत्त एएनआयने दिले होते.तसेच ट्रम्प यांनी त्यांच्या पोस्टमध्ये मोठी धमकी देखील दिली आहे. "यामुळे, मी भारताकडून अमेरिकेला दिल्या जाणाऱ्या टॅरिफमध्ये लक्षणीय रीतीने वाढ करणार आहे," असे ट्रम्प म्हणाले आहेत. मात्र यावेळी त्यांनी ही नवीन वाढ कोणत्या स्वरूपात असेल याबद्दल कोणताही खुलासा केलेला नाही.काही दिवसांपूर्वी भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली होती. तसेच रशियाकडून तेल खरेदी केली जात असल्याच्या कारणावरून भारतावर दंड लादण्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ३० जुलैला केली. हा दंड किती असेल याबद्दल कोणतीही स्पष्टता देण्यात आलेली नव्हती. यानंतर काही दिवसांतच त्यांनी पुन्हा पोस्ट करत भारताला धमकी दिली आहे.भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने भारतावर टीका करत आहेत. यातच ट्रम्प यांनी दावा केला होता की, मात्र, एएनआय या वृत्तसंस्थेला सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भारतीय तेल कंपन्यांची रशियाकडून तेल खरेदी चालूच आहे. त्यांच्या पुरवठ्याचे निर्णय किंमत, कच्च्या तेलाचा दर्जा, इन्व्हेंटरीज, लॉजिस्टिक्स आणि इतर आर्थिक घटकांवर अवलंबून असतात, असे सूत्रांनी सांगितले होते.

# न्यायालयाकडून गांधींची कानउघाडणी

## तुमची मते संसदेत मांडायला हवीत, समाज माध्यमांवर नाही



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चीनने भारताचा भूभाग गिळंकृत केला याचे विश्वासार्ह पुरावे तुमच्याकडे आहेत काय? मग तुम्ही अशी विधाने का करता? तुम्ही खरे भारतीय असाल तर अशी विधाने करणार नाहीत," अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना सुनावले. मात्र त्यांच्याविरुद्धच्या फौजदारी मानहानीच्या खटल्यातील कार्यवाहीलाही न्यायालयाने स्थगिती दिली.**

भारत जोडो यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी भारतीय सैन्याबद्दल वादग्रस्त टिप्पणी केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. २०२०च्या गलवान संघर्षादरम्यान चिनी सैनिक भारतीय लष्कराच्या जवानांना मारहाण करत आहेत, असे विधान त्यांनी केल्याच्या आरोपावरून लखनऊच्या न्यायालयात सुरू झालेल्या कार्यवाहीला स्थगिती देण्यास अलाहाबाद उच्च न्यायालयाने नकार दिला. त्याला आव्हान देणाऱ्या राहुल गांधी यांच्या अपिलावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. न्यायाधीश

### कलम २२३चा संदर्भ दिला

गांधी अधिक चांगल्या पद्धतीने टिप्पणी करू शकले असते यावर सहमती दर्शवत सिंघवी म्हणाले की, ही तक्रार केवळ याचिकाकर्त्याला त्रास देण्याचा प्रयत्न आहे. सिंघवी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताच्या कलम २२३चा संदर्भ दिला आणि सांगितले की न्यायालयाने फौजदारी तक्रारीची दखल घेण्यापूर्वी आरोपीची पूर्वसुनावणी अनिवार्य होती.

दीपंकर दत्ता आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकार आणि या प्रकरणातील तक्रारदाराला नोटीस बजावली.न्यायालयाने राहुल गांधी यांना या विधानांवरून फटकारले. "तुम्हाला कसे कळले की २००० चौरस किलोमीटर भारतीय भूभाग चीनने गिळंकृत केला आहे? तुम्ही तिथे होता का? कोणतीही माहिती नसताना तुम्ही ही विधाने का करता? तुम्ही खरे भारतीय असाल तर तुम्ही अशा प्रकारची विधाने करू नयेत," अशा शब्दांत न्यायालयाने सुनावले.वकील सिंघवी यांनी जर विरोधी पक्षनेते मुद्दे उपस्थित करू शकत नसतील तर ती दुर्दैवी परिस्थिती असेल.



# ॥ श्रावण मासी हर्ष मानसी ॥



वेरूळ गावातील येळगांगा नदीजवळ हे प्राचीन मंदिर असून मंदिराचं बांधकाम लालरांगाच्या दगडाने करण्यात आलेलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा आणि शहाजी राजे भोसले यांचे वडील मालोजीराव भोसले यांनी १६व्या शतकात मंदिराचा जीर्णोद्धार केला. या नंतर अहिल्याबाई होळकर यांनी १७९१ मध्ये परत एकदा या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता

## मध्यरात्री १२ वाजता होणार पूजा

पूर्वी मंदिरामध्ये भाविकांकडून मोठ्या प्रमाणात अभिषेक होत होते. मात्र सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मंदिरामध्ये अभिषेक करण्यास बंधनं घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि लोकप्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय पूजा महाशिवरात्रीच्या मध्यरात्री १२ वाजता संपन्न होणार आहे.

## मंदिराचा नेमका इतिहास काय आहे ?

या मंदिराचे बांधकाम लाल रंगांच्या दगडामध्ये करण्यात आले आहे. घृष्णेश्वर मंदिर हे एक प्राचीन शंकराचे मंदिर आहे.वेरूळपासून अवघ्या दीड किलोमीटरवर असलेले घृष्णेश्वर हे शंकर मंदिर भारतातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. तसेच बारा ज्योतिर्लिंगातील हे शेवटचे ज्योतिर्लिंग आहे. शिवपुराण, स्कंदपुराण, रामायण, महाभारत या ग्रंथांत या मंदिराचे उल्लेख दिसून येतात. वेरूळ गावातील येलगंगा नदीजवळ हे मंदिर असून छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचे आजोबा आणि शहाजीराजे भोसले यांचे वडील मालोजीराजे भोसले यांनी या मंदिराचा 16 व्या शतकात पहिल्यांदा जीर्णोद्धार केला होता. सध्याचे अस्तित्वात असलेले मंदिर इ.स. 1730 मध्ये मल्हारराव होळकरांच्या पत्नी गौतमीबाईंनी बांधलेले असून नंतर शिवभक्त अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा परत एकदा जीर्णोद्धार केला. या मंदिराचे बांधकाम लाल रंगांच्या दगडामध्ये करण्यात आले आहे. या मंदिराचे नक्षीकाम अवर्णनीय आहे. या मंदिराला 27 सप्टेंबर 1960 रोजी राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले.

## मंदिराची वास्तुकला..

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात पारंपारिक दक्षिण भारतीय वास्तू पाहता येते. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात अंतर्गत कक्ष आणि गर्भगृह आहे. या मंदिराचे बांधकाम, 4400 चौरस फूट क्षेत्रावर पसरलेले आहे. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगमंदिर परिसरामध्ये पाच-स्तरीय उंच शिखर आणि अनेक खांब आहेत, जे पौराणिक गुंतागुंतीच्या कोरीव कामाच्या स्वरूपात बांधलेले आहेत. मंदिराच्या आवारात बांधलेल्या लाल दगडी भिंती मुख्यतः भगवान शिव आणि भगवान विष्णू यांचे दहा अवतार दर्शवितात. गर्भगृहात पूर्वेकडे शिवलिंग असून तेथे नंदीस्वरची मूर्तीही दिसते.

## कथा काय आहे ?

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाची कहाणी पती-पत्नी जोडप्या सुधर्मा आणि सुधा यांच्या कथेपासून सुरू होते. दोघेही त्यांच्या वैवाहिक जीवनात आनंदी होते, परंतु ते बालसुखापासून वंचित होते आणि हे सिद्ध झाले की सुदेहा कधीही आई होऊ शकत नाही. म्हणून सुदेहाने तिचा पती सुधर्मा हिची धाकटी बहीण घुश्मासोबत लग्न केले. वेळ गेला आणि घुश्माच्या गर्विष्ठतेपासून, एक सुंदर मुलाचा जन्म झाला. पण हळू हळू तिच्या हातातून तिचा पती, प्रेम, घर आणि आदर जात असल्याचे पाहून सुधाच्या मनात ईर्षेची बीजं फुटू लागली आणि एके दिवशी संधी पाहून तिने मुलाची हत्या केली आणि त्याच तळ्यामध्ये त्याचे शरीर त्या तलावात दफन केले ज्यात घुश्मा शिवलिंगाचे विसर्जन करत होती. सुधर्माची दुसरी पत्नी घुश्मा, जी भगवान शिवची भक्त होती, ती दररोज सकाळी उठून 101 शिवलिंगे बनवून पूजन करायची आणि नंतर तलावामध्ये विसर्जित करत असे. मुलाची बातमी ऐकून चहूबाजूंनी आक्रोश झाला, पण दररोज प्रमाणेच, घुश्माही शिवलिंग बनवून शांत मनाने भगवान शिवाची पूजा करत राहिली आणि जेव्हा ती तलावात शिवलिंगाचे विसर्जनकरायला गेली, तेव्हा तिचा मुलगा जिवंत बाहेर आला आला. त्याच वेळी भगवान शिव सुद्धा घुश्माला दिसले, भोलेनाथ सुधाच्या या कृतीवर रागावले आणि तिला शिक्षा आणि घुश्माला वरदान देऊ इच्छित होते. पण घुश्माने सुधेला क्षमा करावी अशी विनवणी केली आणि भगवान शंकराला लोकांच्या कल्याणासाठी येथे राहण्याची प्रार्थना केली. घुश्माची विनंती मान्य करून भोलेनाथ शिवलिंगाच्या रूपाने येथेच राहू लागले आणि हे स्थान जगभरात घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध झाले. घृष्णेश्वर मंदिराजवळ एक तलाव आहे.ज्याचं नाव शिवालय तलाव असे आहे. भाविक लोक घृष्णेश्वर मंदिरासोबत या तलावाला देखील मोठ्या भक्ती भावाने भेट देतात.



**औरंगाबाद : बारावं ज्योतिर्लिंग म्हणून जगभर प्रसिद्ध असलेलं औरंगाबाद जिल्ह्यातील घृष्णेश्वर मंदिर हे शेवटचं ज्योतिर्लिंग आहे. या नंतर ज्योतिर्लिंग कुठेही प्रकट झालं नसल्याने या ठिकाणाला पूर्णस्थान म्हणून धार्मिक मान्यता आहे. या ठिकाणी भाविकांनी मागितलेले प्रत्येक नवस, मागणं पूर्ण होत असल्याची अख्यायिका आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख म्हणून परिचित आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील वेरूळलेणीच्या जवळच घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग आहे. हे एक प्राचीन महादेवाचं मंदिर आहे. या ठिकाणाचे उल्लेख रामायण, महाभारत, शिवपुराण, स्कंदपुराण या ग्रंथात आढळतात.**

## घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग कथा

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाची कहाणी पती-पत्नी जोडप्या सुधर्मा आणि सुधा यांच्या कथेपासून सुरू होते. दोघेही त्यांच्या वैवाहिक जीवनात आनंदी होते, परंतु ते बालसुखापासून वंचित होते आणि हे सिद्ध झाले की सुदेहा कधीही आई होऊ शकत नाही. म्हणून सुदेहाने तिचा पती सुधर्मा हिची धाकटी बहीण घुश्मासोबत लग्न केले. वेळ गेला आणि घुश्माच्या गर्विष्ठतेपासून, एक सुंदर मुलाचा जन्म झाला. पण हळू हळू तिच्या हातातून तिचा पती, प्रेम, घर आणि आदर जात असल्याचे पाहून सुधाच्या मनात ईर्षेची बीजं फुटू लागली आणि एके दिवशी संधी पाहून तिने मुलाची हत्या केली आणि त्याच तळ्यामध्ये त्याचे शरीर त्या तलावात दफन केले ज्यात घुश्मा शिवलिंगाचे विसर्जन करत होती. सुधर्माची दुसरी पत्नी घुश्मा, जी भगवान शिवची भक्त होती, ती दररोज सकाळी उठून 101 शिवलिंगे बनवून पूजन करायची आणि नंतर तलावामध्ये विसर्जित करत असे. मुलाची बातमी ऐकून चहूबाजूंनी आक्रोश झाला, पण दररोज प्रमाणेच, घुश्माही शिवलिंग बनवून शांत मनाने

# श्रावणात का करतात उपवास?

श्रावण महिन्यात कुणी आठवड्यातल्या एखाद्या दिवशी उपवास करतात तर काही जणांचा संपूर्ण महिनाभर उपवास असतो... काही जण खास करून सोमवार पाळतात... पण, हा उपवास का पाळतात? या प्रश्नाचं उत्तर आज आपण जाणून घेणार आहोत... सोमवार हा शंकराचा वार म्हणून समजला जातो. मग, शंकराला खूश करण्यासाठी सोमवारच्या दिवशी अनेक महिला आणि अविवाहीत मुली उपवास करतात. देवांचा देव म्हणजे महादेव.... श्रावण महिन्यात संपूर्ण भारतात प्रत्येक मंदिरात घरात हर हर महादेव असे स्वर आपल्या कानावर पडतात. श्रावणातल्या प्रत्येक सोमवारी सर्व महादेव मंदिरात महादेवाचे पूजन एका



विशिष्ठ पद्धतीने केले जाते. याचे कारण म्हणजे श्रावण महिन्यात शिव आणि पार्वती यांच्या पूजनाचे महत्त्व हिंदू ग्रंथांमध्ये खूप अधिक प्रमाणात वर्णन केले आहे. श्रावण महिन्यातील महादेवाच्या पूजेला खूप फलदायी मानले गेले आहे. याचे एक कारण म्हणजे श्रावण महिन्याला शंकराच्या उपासनेचा महिना असे सांगितले आहे. त्याआधी देवी सतीने शंकराला प्रत्येक जन्मात पती स्वरुपात मिळवण्याचा प्रण केला होता. देवी सतीने त्यांच्या दुसऱ्या जन्मात पार्वती असे नाव घेऊन राजा हिमाचल आणि राणी मैना यांच्या घरात मुलीच्या रुपात जन्म घेतला. पार्वतीने श्रावण महिन्यात निराहार राहून कठोर व्रत करून महादेवाला प्रसन्न केले व विवाह केला. त्यानंतर महादेवाला श्रावण महिना विशेष झाला.

# श्रावणाची सुरुवात

वर्ष १९५३ मध्ये शेवटच्या वेळी श्रावण महिन्याची सुरुवात सोमवारच्या दिवशी झाली होती. तब्बल ७१ वर्षांनंतर यंदा हा योग पुन्हा आला आहे. त्यासोबतच १८ वर्षांनंतर ५ श्रावणी सोमवार असलेला हा महिना असेल. ७१ वर्षांनंतर यंदा सोमवारपासून श्रावणाची सुरुवात; १८ वर्षांनंतर ५ श्रावणी सोमवार असलेला महिनावर्ष १९५३ मध्ये शेवटच्या वेळी श्रावण महिन्याची सुरुवात सोमवारच्या दिवशी झाली होती. तब्बल ७१ वर्षांनंतर यंदा हा योग पुन्हा आला आहे. त्यासोबतच १८ वर्षांनंतर ५ श्रावणी सोमवार असलेला हा महिना असेल.श्रावण महिना हिंदू धर्मात विशेष महत्त्वाचा मानला जातो. विशेषतः शिवभक्तांसाठी हा महिना अत्यंत श्रद्धेचा असतो. श्रावण सोमवारी भगवान शिवाची उपासना, उपवास आणि विविध धार्मिक अनुष्ठान आयोजित केली जातात. यंदा, तब्बल १८ वर्षांनंतर ५ श्रावणी सोमवार येत आहेत. त्यामुळे हा महिना शिवभक्तांसाठी विशेष ठरणार आहे.श्रावण सोमवारी मंदिरांमध्ये विशेष पूजेचे आयोजन केले जाते. भगवान शिवाचे दर्शन घेण्यासाठी आणि अभिषेक करण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने मंदिरात जातात.



फळाहार करणे आणि शिवलिंगावर जल अर्पण करणे याला विशेष महत्त्व दिले जाते. या पवित्र महिन्यात शिवभक्त विविध प्रकारे भगवान शिवाची आराधना करतात. गंगा जलाने अभिषेक, बेलपत्र अर्पण आणि रुद्राभिषेक ही काही प्रमुख पूजा पद्धती आहेत. श्रद्धाळू भक्तांच्या मते, या महिन्यात केलेली पूजा आणि व्रत विशेष फलदायी ठरतात.७१ वर्षांनंतर येणाऱ्या या योगामुळे श्रद्धाळू भक्तांमध्ये विशेष उत्साह आहे. विशेषतः, ५ श्रावणी सोमवार येण्याचा योग आणि सोमवारी श्रावणाची सुरुवात हा धार्मिक दृष्टिकोनातून एक महत्त्वाचा क्षण आहे.

ओव्हल कसोटी

## विजयानंतर कोच गंभीरची लक्षवेधी प्रतिक्रिया

# आम्ही कधी जिंकू, कधी हरू!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ओव्हल कसोटीत टीम इंडियाने इंग्लंडचा सहा धावांनी पराभव केला आणि पाच सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत आणली. शेवटच्या दिवसाच्या पहिल्या सत्रात भारताने इंग्लंडला ३७४ धावांच्या प्रत्युत्तरात ३६७ धावांवर गुंडाळले. भारताचे गोलंदाज मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णा यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर टीम इंडियाला हा विजय मिळवता आला आहे. भारताच्या या विजयानंतर टीम इंडियाचा कोच गौतम गंभीरने मोठं वक्तव्य दिलं आहे.**

### एटकिन्सनला क्लीन बोल्ड करत विजय



मोहम्मद सिराजने जादुई चेंडूवर गस एटकिन्सला क्लीन बोल्ड करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताचा विजय पाहून एकच सर्वांनी जल्लोष केला. तर ड्रेसिंग रूममध्येही सपोर्ट स्टाफ आणि भारताच्या खेळाडूंनी एकमेकांना मिठी मारत सेलिब्रेशन केलं. ओव्हलच्या मैदानावर रोमहर्षक विजय मिळवल्यानंतर आणि मालिका बरोबरीत आणल्यानंतर, टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या पोस्टने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. पोस्टच्या कॅप्शनमध्ये गंभीरने लिहिलं की, संघ कधीही कोणासमोर झुकणार नाही.गौतम गंभीरने भारताच्या विजयाचे काही फोटो शेअर केले आणि कॅप्शनमध्ये लिहिलं, “आम्ही कधी जिंकू, कधी आम्ही पराभूत होऊ, पण कधीच आम्ही झुकणार नाही. कमाल खेळलात पोरांनो.”ओव्हल कसोटीत दोन्ही संघांमध्ये खूपच रोमांचक सामना झाला. एका वेळेला पाचव्या कसोटीत इंग्लंडचा विजय निश्चित वाटत होता, पण मोहम्मद सिराजने शेवटच्या डावात पाच विकेट्स घेत सामन्याचं चित्र पालटलं. भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडच्या उर्वरित सात विकेट ६७ धावांच्या आत घेतल्या आणि संघाला विजय मिळवून दिला. इंग्लंडला पाचव्या दिवशी ३५ धावांची गरज होती आणि भारताला ४ विकेट हवे होते.मोहम्मद सिराजने पाचव्या दिवसाच्या त्याच्या स्पेलमधील पहिल्याच षटकात जेमी ओव्हरटनला माघारी धाडलं आणि पुढच्या षटकात जेमी स्मिथचा बळी घेतला. यानंतर प्रसिध कृष्णाने जोश टंगला क्लीन बोल्ड करत बाद केलं. इंग्लंडने आपला ९वा बळी गमावला, तेव्हा त्यांनी ३५७ धावा केल्या होत्या आणि संघ विजयाच्या अगदी जवळ होता. गस एटकिन्सन आणि ख्रिस वोक्स इंग्लंडला विजयाच्या जवळ घेऊन गेले.जेव्हा इंग्लंडचा संघ विजयापासून फक्त ६ धावा दूर होता तेव्हा सर्वांच्या नजरा सिराजच्या पुढच्या षटकावर होत्या. सिराजने यानंतर पहिल्याच जादुई चेंडूवर एटकिन्सनला क्लीन बोल्ड करत संघाला विजय मिळवून दिला.मोहम्मद सिराजने जादुई चेंडूवर गस एटकिन्सला क्लीन बोल्ड करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताचा विजय पाहून एकच सर्वांनी जल्लोष केला. तर ड्रेसिंग रूममध्येही सपोर्ट स्टाफ आणि भारताच्या खेळाडूंनी एकमेकांना मिठी मारत सेलिब्रेशन केलं. ओव्हलच्या मैदानावर रोमहर्षक विजय मिळवल्यानंतर आणि मालिका बरोबरीत आणल्यानंतर, टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या पोस्टने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. पोस्टच्या कॅप्शनमध्ये गंभीरने लिहिलं की, संघ कधीही कोणासमोर झुकणार नाही.गौतम गंभीरने भारताच्या विजयाचे काही फोटो शेअर केले आणि कॅप्शनमध्ये लिहिलं, “आम्ही कधी जिंकू, कधी आम्ही पराभूत होऊ, पण कधीच आम्ही झुकणार नाही. कमाल खेळलात पोरांनो.”ओव्हल कसोटीत दोन्ही संघांमध्ये खूपच रोमांचक सामना झाला. एका वेळेला पाचव्या कसोटीत इंग्लंडचा विजय निश्चित वाटत होता, पण मोहम्मद सिराजने शेवटच्या डावात पाच विकेट्स घेत सामन्याचं चित्र पालटलं. भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडच्या उर्वरित सात विकेट ६७ धावांच्या आत घेतल्या आणि संघाला विजय मिळवून दिला. इंग्लंडला पाचव्या दिवशी ३५ धावांची गरज होती

### इंग्लंडला ३५ धावांची गरज होती

मोहम्मद सिराजने पाचव्या दिवसाच्या त्याच्या स्पेलमधील पहिल्याच षटकात जेमी ओव्हरटनला माघारी धाडलं आणि पुढच्या षटकात जेमी स्मिथचा बळी घेतला. यानंतर प्रसिध कृष्णाने जोश टंगला क्लीन बोल्ड करत बाद केलं. इंग्लंडने आपला ९वा बळी गमावला, तेव्हा त्यांनी ३५७ धावा केल्या होत्या आणि संघ विजयाच्या अगदी जवळ होता.

# मोहम्मद सिराज झाला प्रसिद्ध!

## प्रसिद्ध कृष्णाचंही ऐतिहासिक विजयात मोलाचं योगदान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचवा कसोटी सामना ओव्हलच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडसमोर विजयासाठी ३७४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. ओव्हलच्या मैदानावर इतक्या मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला नव्हता. त्यामुळे इंग्लंडला सामना जिंकण्यासाठी इतिहास घडवायचा होता.**



इंग्लंडचा संघ इतिहास घडवण्याच्या उंबरठ्यावर पोहोचला होता. पण भारतीय गोलंदाजांच्या दमदार गोलंदाजीच्या बळावर इंग्लंडचा संघ विजयापासून ६ धावा दूर राहिला.पाचव्या कसोटीत भारतीय संघाच्या अंतिम अकरात मोठा बदल करण्यात आला होता. संघातील प्रमुख गोलंदाज जसप्रीत बुमराहला या सामन्यातून विश्रांती देण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण जबाबदारी मोहम्मद सिराजवर होती. सिराजला साथ देण्यासाठी प्रसिध कृष्णाला अंतिम अकरात स्थान दिलं गेलं होतं. गेल्या सामन्यात अंशुल कंबोज संघात होता, पण त्याला आपली छाप सोडता आली नव्हती. प्रसिध कृष्णाला या मालिकेतील सुरूवातीच्या सामन्यात हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. त्यामुळे तो या महत्वाच्या सामन्यात सिराजला चांगली साथ देणार का? अर्शदीपसारखा डावखुऱ्या हाताचा वेगवान गोलंदाज असताना पुन्हा एकदा प्रसिध कृष्णा का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले गेले होते. पण प्रसिधने सर्वांचे अंदाज खोटे ठरवले.या सामन्यातील पहिल्या डावात गोलंदाजी करताना सिराजने १६.२ षटकात ८६ धावा खर्च करत ४ गडी बाद केले होते. तर प्रसिध कृष्णाने १६ षटकात ६२ धावा करत ४ गडी बाद केले. दोघांनी मिळून पहिल्या डावात ८ गडी बाद केले. तर दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना या दोघांवर मोठी जबाबदारी होती.

### प्रसिध कृष्णाने ४ गडी बाद केले

दुसऱ्या डावातही दोघांनी दमदार गोलंदाजी केली. दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना सिराजने ३०.१ षटक गोलंदाजी करत १०४ धावा खर्च केल्या आणि ५ गडी बाद केले. तर प्रसिध कृष्णाने २७ षटक टाकली आणि १२६ धावा खर्च करत ४ गडी बाद केले. या दोघांनी दोन्ही डावात मिळून १७ गडी बाद केले. त्यामुळे ज्या गोलंदाजी आक्रमणावर प्रश्न उपस्थित केले जात होते.


स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
। दि. 5 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

DYP DR. D. Y. PATIL COLLEGE OF PHARMACY

DR. D. Y. PATIL COLLEGE OF PHARMACY, AKURDI, PUNE

NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

ACCREDITED WITH GRADE A+ NAAC



Institute code : 6371

STUDENT INTAKE

| | |
|---|---|
| D. Pharm | 60 |
| F. Y. B Pharm | 100 |
| Pharm D | 30 |
| Pharm D (PB) | 10 |
| M Pharm ((Pharmaceutics) | 15 |
| M Pharm (Pharmaceutical Quality Assurance) | 15 |
| M Pharm (Pharmacology) | 15 |
| M Pharm (Regulatory Affairs) | 15 |
| M Pharm (Pharmaceutical Chemistry) | 06 |
| M Pharm (Phytopharmacy & Phytomedicine) | 09 |

www.dyppharmaakurdi.ac.in

@dypcopakurdipune

# शिवसेनेचे धोरण नेहमीच कामगारांच्या हिताचे- इरफान सय्यद

## मातोश्री व रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**मातोश्री व रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्थांनी कामगारांच्या आर्थिक आत्मनिर्भरतेचा मार्ग खुला केला आहे. सभासदसंख्या वाढ, ठेवी, स्वनिधी, गुंतवणूक आणि पारदर्शक कारभार हीच यशाची गुरुकिल्ली ठरली आहे. शिवसेनेचे धोरण कायम कामगारवर्गाच्या हिताचे आहे आणि भविष्यातही राहील अशी ग्वाही माथाडी कामगार नेते इरफान सय्यद यांनी दिली.**

आकुर्डी येथील खंडोबा सांस्कृतिक भवन येथे मातोश्री माथाडी कामगार सहकारी पतसंस्था आणि रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्था या दोन्ही संस्थांची वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीपणे पार पडली.

रायरेश्वर पतसंस्थेचा ३२ वा अहवाल अध्यक्ष सतिश कंटाळे यांच्या अध्यक्षतेखाली सादर झाला. सदस्यसंख्या 1270 पर्यंत पोहोचलेली असून, संस्थेने चांगल्या प्रकारे आर्थिक प्रगती साधली आहे संस्थेचे वसूल भाग भांडवल 7 कोटी 45 लाख, ठेवी: 2 कोटी 5 लाख, कर्जवाटप: 12 कोटी 35 लाख, स्वनिधी निधी 2 कोटी 37 लाख, बँकेत गुंतवणूक: 3 कोटी 24 लाख, निव्वळ नफा: 1 कोटी 5 लाख इतका आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी रायरेश्वर माथाडी कामगार संस्थेचे श्रीकांत मोरे (उपाध्यक्ष), ज्ञानेश्वर घनवट (सचिव), रोहित नवले (खजिनदार), तसेच संचालक भिवाजी वाटेकर, शंकर निकम, विजय खंडागळे, सुभाष पुजारी, बाळू ओव्हाळ, संदीप चोरे, गुलाब शिंदे आदीं उपस्थित होते.

मातोश्री पतसंस्थेचा 28 वा अहवाल अध्यक्ष पांडुरंग कदम यांच्या अध्यक्षतेखाली सादर झाला. सदस्यसंख्या 1444 पर्यंत पोहोचलेली असून, संस्थेने चांगल्या प्रकारे आर्थिक प्रगती साधली आहे. संस्थेचे वसूल भाग भांडवल: 9 कोटी 70 लाख, ठेवी: 2 कोटी 34 लाख, कर्जवाटप: 17 कोटी 96 लाख, स्वनिधी निधी 3 कोटी 53 लाख, बँकेत गुंतवणूक 2 कोटी 98 लाख, निव्वळ नफा 1 कोटी 32 लाख, इतका आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी पांडुरंग कदम (अध्यक्ष) श्री बबन काळे (उपाध्यक्ष), उध्दव सरोदे (सचिव), सर्जेराव कचरे (खजिनदार), तसेच संचालक गोरक्ष दुबाले, बाबासाहेब पोते, अशोक साळुंके , विठ्ठल इंगळे , समर्थ नाईकवडे, ज्ञानदेव पाचपुते ,चंद्रकांत पिंगट, आदींनी उपस्थिति लावली. सभेच्या अध्यक्षस्थानी माथाडी कामगारांचे नेते इरफान सय्यद होते. प्रमुख पाहुणे म्हणून असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्ट, पुणे अध्यक्ष दिलीप देशमुखतसेच महाराष्ट्र मजदूर संघटनेचे पदाधिकारी, सभासद कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जेराव कचरे व अहवाल वाचन प्रकाश पवार व धर्मराज कदम यांनी केले.



# मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यात स्थापन करा!

## खासदार श्रीरंग बारणे यांची कायदा मंत्र्यांकडे मागणी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुणे जिल्ह्याची लोकसंख्या दीड कोटींपर्यंत पोहोचली आहे. महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये पुण्याची गणना होते. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यात स्थापन करण्याची मागणी शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्याकडे केली आहे.**




. खासदार बारणे यांनी कायदा मंत्री मेघवाल यांची दिल्लीत भेट घेतली. पुण्यात खंडपीठ स्थापन होण्याबाबतची गरज त्यांच्या निदर्शनास आणून दिली. या मागणीचे सविस्तर निवेदन त्यांना दिले. खासदार बारणे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पुणे, पिंपरी-चिंचवडसह लगतच्या अहिल्यानगर, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणांमध्येही वाढ होत आहे. पुणे महानगर क्षेत्राची लोकसंख्या आजमितीला दीड कोटीपर्यंत जाऊन पोहोचली आहे. औद्योगिक, आयटी हब, सांस्कृतिक, शिक्षणाचे माहेरघर असलेले पुणे मोठ्या झपाट्याने विस्तारत आहे. मुंबई उच्च न्यायालयातील खटल्यापैकी ४५ टक्के खटले पुणे जिल्ह्यातील आहेत.

पुण्यात खंडपीठ नसल्याने पक्षकारांना खटल्याच्या सुनावणीसाठी सातत्याने मुंबईला जावे लागते. प्रवासात चार तासांचा वेळ जाण्याबरोबरच आर्थिक खर्च आणि मानसिकत्रासही सहन करावा लागत आहे. अहिल्यानगर, सातारा, सोलापूर जिल्हे भौगोलिकदृष्ट्या पुणे जिल्ह्यालगत आहेत. या जिल्ह्यातील नागरिकांनाही या समस्यांना सामोरे जावे लागते. सद्यस्थितीत नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कार्यरत आहे.

त्यामुळे या भागातील लोकांना न्यायाचा लाभ मिळत आहे. कोल्हापूरमध्येही मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्यात येत आहे. नागरिकांना वेळेवर, जलदगतीने न्याय मिळणे आवश्यक आहे. न्यायाला होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांचा न्याय पालिकेवरील विश्वास कमी होताना दिसून येत आहे. न्याय पालिकेवरील विश्वास मजबूत करण्यासाठी जलदगतीने न्याय मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे पुण्यात मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करावे, अशी मागणी खासदार बारणे यांनी निवेदनातून केली आहे.

## माटे हायस्कूलमध्ये शालेय विद्यार्थी वाहतूक,परिवहन समितीची स्थापना

## शिक्षण विश्व: विद्यार्थी सुरक्षिततेला प्राधान्य देऊन समितीची स्थापना

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**व्ही.के. माटे हायस्कूल चिंचवड मध्ये शालेय विद्यार्थी वाहतूक समितीची स्थापना करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी मोरया शिक्षण संस्थेच्या कार्यवाह, तहयात विश्वस्त,प्राचार्या इंद्रायणी माटे पिसोळकर होत्या.**



प्राचार्या इंद्रायणी माटे पिसोळकर म्हणाल्या 2025 -26 या शैक्षणिक वर्षापासून मोरया शिक्षण संस्थेच्या सर्व संलग्न शाळांमधील विद्यार्थ्यांची वाहतूक ही मोरया शिक्षण संस्थेने अधिकृतरित्या करार केलेल्या. श्री स्वामी समर्थ एंटरप्राइजेस यांच्यामार्फत पुरवल्या जाणाऱ्या स्कूल बस मधूनच करण्याचा यावेळी निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा त्या बसमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार असल्यामुळे येथून पुढे श्री स्वामी समर्थ एंटरप्राईजेस यांच्या स्कूल बस मधूनच विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये येण्याचे पालकांना व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. श्री स्वामी समर्थ इंटरप्राईजेस यांच्या स्कूलबस मध्ये विद्यार्थी व पालकांसाठी सुरक्षितता देण्यासाठी जीपीएस यंत्रणा, टॅपिंग प्रेझेंटी, लाईव्ह लोकेशन अधिकृत वाहन चालक व मावशी व वेळेवर विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याचे व घरी सोडण्याचे नियोजन , प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र बसण्याची जागा या सर्व सुविधा देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष श्री स्वप्निल शेडगे यांनी सांगितले. श्री स्वामी समर्थ इंटरप्राईजेस चे संचालक श्री. नवले यांनी श्री स्वामी समर्थ इंटरपाईजेस यांच्यामार्फत या सर्व सुविधा देण्याचे आश्वासन दिले .मोरया शिक्षण संस्थेने नाकारलेल्या ,परवानगी न दिलेल्या किंवा संस्थेशी करार नसणाऱ्या स्कूल बस आणि व्हॅन मधून विद्यार्थ्यांना पालकांनी पाठवू नये असे आवाहन मोरया शिक्षण संस्थेचे , परिवहन समितीचे अध्यक्ष श्री स्वप्निल शेडगे यांनी सांगितले.

परिवहन समितीची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे गठित करण्यात आली. अध्यक्ष स्वप्निल शेडगे उपाध्यक्ष इंद्रायणी माटे- पिसोळकर ,लोकप्रतिनिधी शितल शिंदे, सचिव हनुमंत हुचगोळ ,समिती सदस्य रणजीत सावंत, दिलीप साळुंके, विलास पाटील, चित्रा आपटे, पूजा पिसाळ, छाया कुलकर्णी वाहतूक कंत्राटदार महेश नवले ,वाहतूक विभाग चिंचवड शंकर ढामसे मोरया शिक्षण संस्थेच्या सर्व शाळांची एकत्रित परिवहन समिती गठीत करण्यात आली. सूत्रसंचालन हनुमंत हुचगोळ यांनी केले तर आभार विलास पाटील यांनी मानले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'मिनी खान्देश' फुलला!

## कानबाई उत्सव खान्देशी संस्कृतीच्या एकजुटीचा प्रयत्न – गिरीश महाजन

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये खान्देशी बांधवांनी आपली संस्कृती जपून शहराला 'मिनी खान्देश'चे स्वरूप दिले आहे, असे गौरवोद्गार जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी काढले. पिंपरी-चिंचवडमध्ये आयोजित 'खान्देश सार्वजनिक श्री कानबाई माता उत्सव २०२५' च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. हा उत्सव केवळ एक धार्मिक सोहळा नसून, आपल्या संस्कृती आणि परंपरेचा जागर असल्याचेही त्यांनी सांगितले.**





काल दुपारपासूनच उत्सवाची सुरुवात श्री कानबाई मातेच्या भव्य मिरवणुकीने झाली. श्री तुळजाभवानी मंदिर, शिवनगरी येथून सुरू झालेली ही मिरवणूक आहेर गार्डन, वाल्हेकरवाडी येथे पोहोचली. मिरवणुकीमध्ये शिरपूर येथील गोल्डन बँड आणि अमळनेर येथील राधे कृष्ण बँडच्या संगीताने एक वेगळीच ऊर्जा संचारली होती. या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण धुळे आणि नंदुरबार येथील आदिवासी समाज बांधवांचे नेत्रदीपक नृत्य ठरले. पारंपरिक वेशभूषेत, डोक्यावर कलश घेऊन चालणाऱ्या महिला आणि पारंपरिक पोशाखातील पुरुषांचा सहभाग लक्षवेधी होता.

महाजन आपल्या भाषणात म्हणाले, "आज पिंपरी-चिंचवडमध्ये हजारो खान्देशी बांधवांना एकत्र आलेले पाहून मला खूप आनंद होत आहे. हा उत्सव केवळ पूजा-अर्चा किंवा विधीचा कार्यक्रम नाही, तर आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा जागर आहे. पिंपरी-चिंचवड हे एक असे शहर आहे, जिथे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक आले आहेत आणि या शहराने सर्वांना आपलेसे केले आहे. कामासाठी, रोजगारासाठी आपण इथे आलो असलो तरी, आपली संस्कृती आणि परंपरा आपण विसरलेलो नाही, हेच या उत्सवातून सिद्ध होत आहे. खान्देशाची संस्कृती, अहिराणी भाषा आणि लोककला समृद्ध आहेत. आपली ही समृद्ध परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. कानबाई माता ही खान्देशातील प्रत्येकाच्या घरात असलेली देवता आहे.

या मातेचा आशीर्वाद आपल्या सर्वांवर असाच राहो, अशी मी प्रार्थना करतो. तुम्ही सर्वजण एकत्र येऊन हा उत्सव साजरा करत आहात, ही एक चांगली गोष्ट आहे. हा उत्साह असाच कायम राहो!" सायंकाळी आहेर गार्डन येथे मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते श्री कानबाई मातेचे पूजन करून उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "खान्देशातील बांधवांनी पिंपरी-चिंचवडमध्ये येऊन आपली संस्कृती आणि परंपरा जपली आहे, हे पाहून मला अभिमान वाटतो. या शहरात 'मिनी महाराष्ट्र' पाहायला मिळतो आणि आजचा हा उत्सव त्याचाच एक भाग आहे. कानबाई माता ही शक्तीचे प्रतीक असून, तिचे आशीर्वाद आपल्याला सदैव मिळोत. खान्देशी बांधवांनी आपले पारंपरिक लोकसंगीत, आपली भाषा आणि प्रथा जपायला हव्यात."

कार्यक्रमात जलसंपदामंत्री गिरीश महाजन, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार मंगेश चव्हाण, शंकर जगताप, उमा खापरे, राजू मामा भोळे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, धुळ्याचे माजी आमदार कुणाल पाटील, सुरेखा जाधव यांच्यासह स्थानिक नगरसेवक, पदाधिकारी आणि सर्व खान्देशी समाज बांधव उपस्थित होते. उत्सवाच्या आयोजकांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला.

कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक नामदेव ढाके यांनी प्रास्ताविकात उत्सवाचा मुख्य उद्देश सांगितला. ते म्हणाले, "या उत्सवाचा उद्देश पिंपरी-चिंचवडमधील सर्व खान्देशी बांधवांना एका व्यासपीठावर आणणे आहे. आपल्याला आपल्या मूळ गावापासून दूर राहावे लागत असले तरी, आपल्या गावाकडील मातीचा सुगंध, आपली संस्कृती आणि आपले पारंपरिक सण-उत्सव आपण विसरू शकत नाही. खान्देशातील संस्कृतीची ओळख आपल्या पुढील पिढीला करून देणे, हे आपले कर्तव्य आहे."

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

रात्री ८ वाजल्यापासून श्री कानबाई मातेच्या गाण्यांचा संगीतमय कार्यक्रम सुरू झाला. श्री कानबाई फ्रेंड्स सर्कल ग्रुप, शिरपूर-धुळे-पुणे चे गायक सागर देशमुख, दिलीप शिंदे, कुणाल महाजन आणि दिनेश शिंदे यांनी त्यांच्या सुमधुर आवाजात भक्तिगीते सादर करून उपस्थितांना भक्तिरसात चिंब केले. हा उत्सव पिंपरी-चिंचवडमधील खान्देशी बांधवांच्या एकजुटीचे आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक ठरला आहे. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी ५०० हून अधिक स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमलता चौधरी यांनी केले, तर हेमंत चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. उद्या, सोमवार ४ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता श्री कानबाई मातेच्या विसर्जन मिरवणुकीने या तीन दिवसीय उत्सवाचा समारोप होईल. ही मिरवणूक आहेर गार्डन येथून सुरू होऊन जाधव घाट, रावेत येथे विसर्जित होईल.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्वात दिंडी

## लोकनृत्य व मराठी गीतांचा ऐतिहासिक सोहळा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्वानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाज परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या अण्णाभाऊंच्या कार्याचा गौरव करत पारंपरिक लोककलांचा अनोखा कार्यक्रम सादर करण्यात आला.**



या कार्यक्रमास जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाबासाहेब रसाळ,सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब आडागळे, संदीपान झोंबाडे, नाना कसबे, संजय ससाणे, अरूण जोगदंड, सतिश भवाळ, नितीन घोलप, युवराज दाखले, भगवान शिंदे, आशाताई शहाणे, केसरताई लांडगे, चंद्रकांत लोंढे, डी.पी.खंडाळे, आण्णा कसबे, शिवाजी साळवे, विशाल कसबे, शांताराम खुडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगद्गुरू तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, त्यांचे मावळे आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या हुबेहूब सादर केलेल्या व्यक्तिरेखा.. विठ्ठल रखुमाई दिंडी भजन मंडळ, तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्या ६५ कलाकारांच्या भव्य दिंडी महोत्सवाने तसेच पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदुंगाचा गजर, भक्तिमय अभंग आणि उत्स्फूर्त जयघोष यामुळे संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला होता. भगव्या पताकांच्या लहरी आणि भजनांच्या सुरांनी वातावरण भारावून गेले होते तर विठू माऊली,जगद्गुरू तुकाराम महाराज,छत्रपती शिवाजी महाराज,त्यांचे मावळे आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या हुबेहूब सादर केलेल्या व्यक्तिरेखा श्रोत्यांनी मोबाईलमध्ये काढून घेतल्या.

त्यानंतर संध्याकाळी ७ वाजता रंगला "लोकगीतांचा भव्य कार्यक्रम". या सत्रात नृत्य कलाकार आरती पुणेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या बहारदार सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली. पारंपरिक मराठी लोकगीतांच्या माध्यमातून त्यांनी स्त्रीजीवन, श्रमसंस्कृती,आणि ग्रामीण भावभावनांचे सुंदर दर्शन घडवले. त्यांच्या लोकगीतातील सहजता आणि रसिकांशी जोडलेली नाळ यामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.